सातारा जिल्हा परिषद,सातारा
सामान्य प्रशासन विभाग

कार्यालयाचा पत्ता : जिल्हा परिषद मुख्य इमारत, 4 था मजला, सातारा-कोरेगांव रोड,
सदर बझार कॅम्प, ता.जि.सातारा

कार्यालय दूरध्वनी क्रं. 02162-295053 Email-dyceogadstr@gamil.com


जा.क्र.आस्था-2(5)/ता.जे.सुची/2023 398 दिनांक : 05/01/2023

**विषय** :- दिनांक 1.1.2023 रोजीची **दिव्यांग कर्मचारी** यांची तात्पुरती ज्येष्ठता सूची प्रसिध्द करणेबाबत..

## ज्ञा प न.

या कार्यालयाचे अधिपत्याखाली असणा-या 1. सहा. प्रशासन अधिकारी, जिल्हा सेवा वर्ग 3 (लिपीकवर्गीय) व्दितीय श्रेणी, 2. कनिष्ठ प्रशासन अधिकारी, 3.विस्तार अधिकारी सांख्यिकी, 4. लघुटंकलेखक, 5. लघुलेखक निम्न श्रेणी, 6. लघुलेखक उच्चश्रेणी, 7. लघुटंकलेखक या संवर्गाची दिनांक 01.01.2022 रोजीची अंतिम ज्येष्ठता सूची जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली आहे. आता महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडील शासन निर्णय क्र. एसआरव्ही-2011/प्र.क्र.284/12, दिनांक 21/10/2011 नुसार दिनांक 1/1/2022 ते 31/12/2022 अखेर नियुक्त केलेल्या वरील संवर्गातील कर्मचारी यांची तात्पुरती (**Provisional**) ज्येष्ठता सूची तयार करुन, याव्दारे प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदरची ज्येष्ठता सूची महाराष्ट्र जिल्हा परिषदा (नेमणूका,जेष्ठता,पगार आणि भत्ते) नियम 1962 मधील नियम 6 व महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठता विनियम) 1982 व महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा सेवाप्रवेशोत्तर परिक्षा नियम 1985 व (सुधारित) नियम 1999 मधील मार्गदर्शक सुचनांचे आधारे तसेच वरील दिनांक 21/10/2011 रोजीचे शासन निर्णयानुसार तयार करण्यात आली आहे.

संबंधित कार्यालय प्रमुख यांना सूचना देण्यात येतात की, सदर दिव्यांग कर्मचारी यांची तात्पुरती ज्येष्ठता सूची, संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे निदर्शणास आणुन द्यावी. तसेच निदर्शणास आणले बाबत ज्येष्ठता सूचीमधील रकाना क्र.15 वर तारखेसह स्वाक्षरी घ्यावी व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

या तात्पुरती ज्येष्ठता सूचीवर कोणाचे आक्षेप / दुरुस्त्या असल्यास, असे आक्षेप / दुरुस्त्या या सदर ज्येष्ठता सूची प्रसिध्द केलेल्या तारखेपासून 15 दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह व संबंधित कार्यालय प्रमुख यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयास वरील मुदतीत सादर करणेची कार्यवाही करावी. विहित मुदतीत आक्षेप / दुरुस्त्या प्राप्त न झाल्यास त्यास संबंधित कार्यालय प्रमुख हे सर्वस्वी जबाबदार राहतील. विहीत मुदतीत प्राप्त झालेले आक्षेप / दुरुस्त्या नियमानुसार योग्य असल्यास त्याप्रमाणे दुरुस्त्या करुन, तात्पुरती ज्येष्ठता सूची अंतिम करणेत येईल. तदनंतर दिनांक 1/1/2021 रोजीची अंतिम ज्येष्ठता सूची व दिनांक 1/1/2022 ते 31/12/2022 अखेर नियुक्त केलेल्या वरील संवर्गातील **दिव्यांग कर्मचारी** यांची अंतिम ज्येष्ठता सूची एकत्रित करुन, दिनांक 1/1/2023 रोजीची 1.सहा. प्रशासन अधिकारी, 2 कनिष्ठ प्रशासन अधिकारी, 3. विस्तार अधिकारी सांख्यिकी, 4. लघुटंकलेखक, 5 .लघुलेखक निम्न श्रेणी, 6. लघुलेखक उच्चश्रेणी, 7. लघुटंकलेखक या संवर्गाची अंतिम ज्येष्ठता सूची प्रसिध्द करणेत येईल.

**(अर्चना वाघमळे)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)**
**सातारा जिल्हा परिषद,सातारा**

**प्रति,**

सर्व संबंधिताना त्यांचे कार्यालय प्रमुखामार्फत.

प्रत-: सर्व संबंधित खातेप्रमुख, -----------------जि.प.सातारा यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत-: सर्व गट विकास अधिकारी पंचायत समिती -------------यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत-: आस्थापना 2(3)/1 (2) सा.प्र.वि.,जि.प.सातारा यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

## कार्यालयाचे नाव- सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सातारा

**सहाय्यक प्रशासन अधिकारी जिल्हा सेवा वर्ग -३ ( लिपीक वर्गीय ) श्रेणी ३ यांची दिनांक ०१.०१.२०२३ रोजीची दिव्यांग कर्मचारी वर्गाची तात्पुरती जेष्ठता यादी प्रसिध्द करणे बाबत**

सहाय्यक प्रशासन अधिकारी जिल्हा सेवा वर्ग -3 ( लिपीकवर्गीय ) श्रेणी 3 यांची दिनांक 29/6/2018 ते 31/12/2022 या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या दिव्यांग कर्मचा-यांची तात्पुरती जेष्ठता सुची

| अ. नं. | जेष्ठता क्रमांक | अधिकारी / कर्मचा-याचे नाव | संबंधितांचे छायाचित्र | प्रवर्ग (नियुक्ती नंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक) | जन्मतारीख | नियुक्तीचा दिनांक | लघुलेखक निम्नश्रेणी म्हणून जेष्ठता यादीतील दिनांक | लघुलेखक (उच्च श्रेणी ) म्हणून जेष्ठता यादीतील दिनांक | नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेन / मर्यादीत विभागीय परिक्षेव्दारे उमेवारांचा गुणवत्ता क्रमांक व परिक्षेचे वर्ष) | जेष्ठता दिनांक/ जेष्ठतेचा मानीव दिनांक | सेवा निवृत्तीचा दिनांक | शेक्षणिक अर्हता | अभिप्राय | कार्यालयाचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | -- | ------------ निरंक ---------------- | | | | | | | | | | | | | |

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
सातारा जिल्हा परिषद